# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (वैयक्तिक)
फॅक्स : २२०२९३४८
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com,
वेब पत्ता : mahajeevan.com


क्र.मजीप्रा/२००९/सभा-११५/(९०)/आ.४

दिनांक : ४.१.२०१०

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय : दि-२४-११-०९ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११५ व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंगळवार दि.२४.११.२००९ रोजी झालेल्या ११५ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपली विश्वासू,

(उ.प्र.महाजन)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : ११५ व्या सभेचे इतिवृत्त.


लिपिक
मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

लिपिक
राज्यमंत्री
(नगरविकास, वने, बंदरे, खार जमीन संसदीय कार्य, क्रीडा व युवक कल्याण व माजी सैनिकांचे कल्याण)

Personal Assistant to Secretary
Public Health Department
Mantralaya, Mumbai

Clerk
Supply & Sanitation Department
Mantralaya, Mumbai 400 032

(२)

प्रत :-

१. वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र.३ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. २ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. अधीक्षक अभियंता, मुख्यालय, म.जी.प्रा., मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र. ५, ६, ७, ९ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ३, ४, व ५ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

3) उप सचिव · पा पु व स वि मंत्रालय मुंबई 32

३. उप मुख्य लेखा अधि. (१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

४. आस्थापना अधिकारी (द.), म.जी.प्रा., मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या कक्षाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रम बाब क्र. ४, ८ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. १ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

५. कायदा व कामगार अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

६. प्रशासकीय नि आस्था.अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

७. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कार्यासन अधि./कक्ष अधिकारी यांच्या माहितीसाठी. आ ३, ५, ७

सौ.डापरे/md.Estt.४ (Kasture)

4/1/2010

04 JAN 2010

मुंबई-३२.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११५ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११५ वी सभा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २४/११/२००९ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री.जयंत पाटील, मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह-अध्यक्ष.
३. मा.श्री.भास्करराव जाधव, राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म.म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. प्रधान सचिव, उर्जा, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.दि.का.खरात , उप सचिव, उर्जा, मंत्रालय, मुंबई-३२
७. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.दि.ग.मोरे, उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस मजीप्राचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्री.डी.सी.सुर्यवंशी, विशेष कार्य अधिकारी तथा मुख्य अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. श्री.आर.जी.होलानी, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, औरंगाबाद
३. श्री.हेमंत चं. लांडगे, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, ठाणे
४. श्री.व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, पुणे
५. श्री.एन.एस.केरकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, नाशिक
६. श्री.प्र.वा.पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. सौ.उषा प्र. महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
८. सौ.सु.वि.कोळेकर, उप सचिव (आस्थापना), पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई
९. श्री. बा.शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
१०. श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११४ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २१ जुलै, २००९ रोजी संपन्न झालेल्या ११४ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११४ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २१/०७/२००९ रोजी संपन्न झालेल्या ११४ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

तत्कालीन कार्यक्रम बाबीतील बाब क्र.६ संदर्भात मा.अध्यक्ष यांनी मुख्य अभियंता यांना न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली अशी विचारणा केली असता, श्री.एच.सी.लांडगे मुख्य अभियंता, कोकण प्रादेशिक विभाग, ठाणे यांनी सांगितले की, देखभाल दुरुस्तीच्या कामासंदर्भात निविदा काढलेल्या आहेत. तसेच तत्कालीन आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.१ च्या सद्यस्थितीबाबत मा.अध्यक्षांनी विचारणा केली असता मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, पुणे यांनी सांगितले की, पुणे शहरालगतच्या शिवणे, कोंढवे, धावडे व इतर २ गावांकरिता प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या निविदा काढलेल्या असून कार्यादेश (Work Order) देण्यात आले आहेत.

मा.अध्यक्ष यांनी असे सुचविले की, यापुढे कार्यक्रम बाब क्र.२ मध्ये कार्यवृत्तावर करण्यात आलेल्या कार्यवाहीसंदर्भात सद्यस्थिती नमुद करण्यात यावी. या अनुषंगाने सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयांबाबत मा. सदस्य सचिव यांनी बैठकीमध्ये उहापोह केला. या संदर्भात सविस्तर चर्चा होऊन मा.अध्यक्ष यांनी असे निदेश दिले की, म.जी.प्रा.चा प्रत्येक महिन्यात/आठवडयात होणारा खर्च विचारात घेऊन आर्थिक नियोजन करावे व त्यानुसारच अल्पकालीन गुंतवणूक करावी म्हणजे व्याजाचे नुकसान होणार नाही. तसेच उर्वरित निधीची दीर्घकालीन गुंतवणूक

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

करावी. निधी गुंतविताना विविध बँकांशी व्याज दराबाबत (जास्तीतजास्त व्याज दर मिळणेबाबत) वाटाघाटी कराव्यात. तसेच सहकारी बँकेमध्ये ठेवी शक्यतो ठेवण्यात येऊ नयेत अशाही सूचना केल्या.

त्याचप्रमाणे वित्त विभागाने घालून दिलेल्या निर्देशानुसार म.जी.प्रा.ने राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये गुंतवणूक करावी. वित्तीय नियोजन कसे केले जाते, याबाबत सविस्तर तपशील तयार करुन मा.अध्यक्षांशी स्वतंत्रपणे चर्चा करावी अश सूचना केल्या. अल्प मुदतीच्या गुंतवणूकीबाबत जी समिती म.जी.प्रा.ने नेमलेली आहे त्या समितीने मा.अध्यक्ष व प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग यांच्या सल्ल्याने निर्णय घेण्याबाबत मा.अध्यक्षांनी निर्देश दिले.

तद्नंतर दिनांक १.७.२००९ व ३१.१०.२००९ या कालावधीमध्ये अल्प मुदतीसाठी केलेल्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.४ : दिवाणी व फौजदारी न्यायालय, वाशी, नवी मुंबई यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची सिडको भवन, नवी मुंबई येथील ४ थ्या मजल्यावरील रिक्त असलेली ७३७४ चौरस फूट जागा भाडे तत्वावर देणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सिडको भवन (दक्षिण कक्ष) येथिल ४ थ्या मजल्यावरील ७३७४ चौ.फूट जागा दिवाणी व फौजदारी न्यायालय वाशी, नवी मुंबई यांना रु. ३५/- प्रति चौरस फूट दरमहा या दराने भाडे तत्वावर देण्यासंदर्भात मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. चर्चेमध्ये मा.मंत्री, ग्राम विकास तथा सह-अध्यक्ष यांनी असे सांगितले की, म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांना वेतनासाठी व निवृत्ती वेतनासाठी स्वत:च्या निधीतूनच तरतुद करावी लागते. तसेच म.जी.प्रा.ला स्वत:चे उत्पन्न स्वत:च मिळवावे लागते. यास्तव न्यायालयाला जागा भाडयाने द्यावयाची असेल तर ती रु. ३५/- पेक्षा कमी दराने दिली जाऊ नये. प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग यांनी या सदंर्भात उप जिल्हाधिकारी व सार्वजनिक बांधकाम खाते यांची संयुक्त समिती नेमावी असे सुचविले. यावर मा.मंत्री, ग्राम विकास तथा सह-अध्यक्ष यांनी असे सांगितले की, अशाप्रकारे समिती नेमण्यास हरकत नाही, मात्र समितीने ठरविलेला भाडे दर जर रु. ३५/- प्रति चौ.फूट या दराच्या खाली असेल तर तो स्वीकारण्यात येऊ नये. तसेच प्रतीवर्षी १० टक्के भाडेवाढही लागू करण्यात यावी. संचालक मंडळातील सर्व सदस्यांनी मा.मंत्री, ग्राम विकास तथा सह-अध्यक्ष यांच्या मतास अनुमोदन दिले व रु. ३५/- प्रति चौ.फूट किंवा त्यापेक्षा जास्त दराने सिडको भवन येथील ४ थ्या मजल्यावरील जागा न्यायालयास भाडयाने देण्याबाबत संमती दर्शविली.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाब क्र. ५:- तरोडा (बु), तरोडा (खु) व सांगवी (ता.व जि. नांदेड ) परिसरासाठी JNNURM अंतर्गत पाणी पुरवठा योजना आणि मलनि:सारण योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मजीप्राने काम करण्याबाबत.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड लगत असलेली तरोडा (बु), तरोडा (खु) ही गांवे महानगरपालिका कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे या दोन्ही गावासह शहराच्या सांगवी भागात पाणी पुरवठा व मलनि:सारण व्यवस्था राबवावयाची आहे. त्यासाठीचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या JNNURM अंतर्गत सादर करावयाचे असून सदरचे प्रस्ताव JNNURM अंतर्गत देय असलेल्या शुल्कानुसार मजीप्राने तयार करावेत. त्याचप्रमाणे या योजना मंजुरीनंतर, ३% या शुल्कानुसार प्रकल्प व्यवस्थापन व सल्लागार म्हणून मजीप्राने काम पहावे, अशी मागणी नांदेड महानगरपालिका यांनी मजीप्राकडे केली आहे.

या अनुषंगाने नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या मागणीनुसार दोन्ही योजनांचे आराखडे व अंदाजपत्रके तयार करण्यास अंदाजित रक्कमेच्या १.५% ते २% दराने व दोन्ही योजनांचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम पहावयास ३% दराने मंजूरी प्रदान करण्यासाठीची सदरची कार्यक्रम बाब असल्याचे मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन सादर केलेल्या प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात संभाव्य समाविष्ट व्हावयाच्या तरोडा (बु), तरोडा (खु), व सांगवी परिसरासाठी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेची सविस्तर आराखडे व अंदाजपत्रके करावयाचे काम JNNURM च्या नियमानुसार अंदाजित किंमतीच्या १.५ ते २ % दराने करणे व दोन्ही योजनांचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून अंदाजित किंमतीच्या ३% दराने काम करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मंजुरी देण्यात आली असून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**अटी :**

१. सदर कामांसाठी केंद्र शासनाकडून वेळेवर निधी उपलब्ध करुन घेणे,सर्व उपांगांसाठी लागणा-या जागा उपलब्ध करुन देणे याची सर्वस्वी जबाबदारी नांदेड - वाघाळा शहर महानगरपालिकेची राहील.

२. निधीच्या अनुपलब्धतेमुळे, किंवा भू-संपादनात येणा-या अडचणींमुळे, किंवा महानगरपालिकेच्या बाजूने कोणत्याही कारणांमुळे पाणी पुरवठा योजनांची कांमे पूर्ण करावयास दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी लागल्यास तसेच मलनि:सारण योजनेची कामे पूर्ण करावयास ३ वर्षापेक्षा

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

जास्त कालावधी लागल्यास, वरील दरांचे नव्याने मुल्यांकन करुन आवश्यकता भासल्यास त्यामध्ये सुधारणा करावयाची मुभा प्राधिकरणास राहील.

३. अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्यासाठी आकारावयाच्या शुल्काची १.५ ते २ मधील टक्केवारी ठरविण्यास मुख्य अभियंता, औरंगाबाद यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. दोन्ही कामासाठी आकारावयाचे शुल्क हे योजना पूर्ण करण्यासाठी लागणा-या एकूण खर्चावर आकारले जाईल.

**कार्यक्रम बाब क्र. ६:- UIDSSMT कार्यक्रमांतर्गत मंजूर वाढीव व सुधारीत तासगांव शहर पाणी पुरवठा योजना टप्पा क्रं. ३ चे काम म.जी.प्रा.मार्फत ६% ई ॲन्ड पी शुल्क आकारुन पूर्ण ठेव तत्वावर करणेबाबत...**

केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT कार्यक्रमांतर्गत तासगांव शहर वाढीव व सुधारीत पाणी पुरवठा योजना टप्पा-३ या योजनेच्या रु.१४.५६० कोटी किंमतीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान असून सदरची योजना म.जी.प्रा.मार्फत पूर्णठेव तत्वावर करण्याबाबतचा मनोदय नगरपरिषद, तासगांव यांनी दर्शविला होता. या अनुषंगाने तासगांव नगरपरिषदेशी संपर्क साधून योजनेचे काम करण्यासाठी योग्य असा करारनामा करणे व निधी उपलब्ध करुन घेऊन निविदा काढण्याचे निर्देश क्षेत्रीय कार्यालयास देण्यात आले होते.

नगरपरिषदेच्या दि.२६.८.०९ च्या पत्र क्र.नं.नपा/वशी/१०२२/२००९ च्या पत्रान्वये, सदरचे काम ६% ईटीपी चार्जेस आकारुन पूर्ण ठेव तत्वावर राबविण्याची विनंती मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे, यांच्याकडे केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या दि.३१.८.०९ च्या पत्र क्र.न.नपा/वशी/१०९०/०९ अन्वये, मूळ मंजुरीनुसार केंद्र तसेच राज्य शासनाकडून प्राप्त व्हावयाच्या अनुदानाव्यतिरिक्त योजनेवर होणारा जादा खर्च नगरपरिषदेमार्फत उपलब्ध करुन देण्याचेही मान्य केले असून, नगरपरिषदेने दि.०४.०७.०९ रोजी रु.५.८२४ कोटी इतका निधीही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्गही केला आहे. असे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

या सर्व बाबीचा विचार करुन नगरपरिषदेच्या मागणीनुसार सदर योजना ६% ईटीपीं चार्जेस आकारुन पूर्ण ठेव तत्वावर राबविल्यास मजीप्रास रु.१.५० कोटी इतके शुल्क म.जी.प्रा.स मिळू शकते, जे म.जी.प्रा.ची सध्याची आर्थिक स्थिती व प्रत्यक्षात असलेला कार्यभार याचा विचार करता म.जी.प्रा.ने स्वीकारणे अपरिहार्य असल्याचे संचालक मंडळास अवगत केले. यावर चर्चा होऊन सदर प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

<u>ठराव</u>

UIDSSMT अंतर्गत मंजूर असलेली वाढीव व सुधारीत तासगांव शहर नळ पाणी पुरवठा योजना टप्पा ३ चे काम पूर्ण ठेव तत्वावर करणेस व त्या पोटी ६% शुल्क आकारण्यास खास बाब म्हणून खालील अटीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत असून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१) सदर कामासाठी आकारण्यात येणारे ६% ई.ॲण्ड पी. शुल्क हे योजना पूर्ण होण्यासाठी होणाऱ्या खर्चावर देय राहील.

२) या कामासाठी केंद्र तसेच राज्य शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान तसेच या अनुदानाव्यतिरिक्त योजनेवर होणाऱ्या खर्चापोटीचा निधी नगरपरिषदेने मान्य केल्यानुसार तातडीने वेळोवेळी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

३) योजनेच्या उपांगासाठी आवश्यक भू-संपादन वेळेत करुन देणे नगरपरिषदेची जबाबदारी राहील.

४) निधी उपलब्धतेअभावी योजनेची कामे रखडल्यास निविदेत नमूद केलेल्या कालावधीपेक्षा योजना पूर्ण करण्यासाठी जास्त कालावधी लागल्यास वरील मान्य केलेल्या दराचे नव्याने मुल्यांकन करुन आवश्यकता भासल्यास त्यामध्ये सुधारणा करण्याची मुभा म.जी.प्रा.स राहील.

**कार्यक्रम बाब क्र. ७ :-"महाजल" कार्यक्रमांतर्गत त्रिशंकू भागासाठी (साई सोसायटी, खिंडवाडी) पाणी पुरवठा योजना,तालुका व जिल्हा सातारा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने १०% लोकवर्गणी भरुन मजीप्राची योजना म्हणून पाणीपट्टी वसुलीसह देखभाल दुरुस्ती करण्याबाबत.**

विषयांकित योजनेस शासनाच्या दि. २८.७.२००९ च्या निर्णय क्र. पापुयो- २१०९/ प्र.क्र. ८२/ पापु-१७, अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने १०% लोकवर्गणी भरुन मजीप्राची योजना म्हणून पाणीपट्टी वसुलीसह देखभाल दुरुस्ती करण्याबाबतचा निर्णय झाला आहे. या अनुषंगाने सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर बाबीवर चर्चा होऊन संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे.

सदर चर्चे दरम्यान मुख्य अभियंता, पुणे यांनी पुणे महसूल क्षेत्रातील सातारा शहरालगतच्या भागासाठीची प्रस्तावित शाहूवाडी पाणी पुरवठा योजना ही मजीप्राने १०% लोकवर्गणीची रक्कम भरुन मजीप्राची योजना म्हणून पाणीपट्टी वसुलीसह देखभाल दुरुस्ती करण्याबाबत ग्रामपंचायत आग्रही

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

असल्याचे नमूद केले. सदरचा प्रस्ताव शासनास सादर केला असून त्यावर शासनाने उपस्थित केलेल्या शे-यांची पूर्तता करण्यात येत आहे. सदर शे-यामध्ये लोकवर्गणी भरण्यासंदर्भात मजीप्राच्या संचालक मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे किंवा कसे, याबाबत अहवाल मागविण्यात आला आहे, असे स्पष्ट केले. यावर चर्चा होऊन शाहूवाडी पा.पु.योजना ही मजीप्राने १०% लोकवर्गणी भरुन मजीप्राची योजना म्हणून राबविण्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

१) "महाजल" कार्यक्रमांतर्गत मंजूर त्रिशंकू भागासाठी (साई सोसायटी, खिंडवाडी) पाणी पुरवठा योजना तसेच शाहूवाडी पा.पु.योजना मजीप्राने १०% लोकवर्गणी भरुन मजीप्राची योजना म्हणून वसुलीसह देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करावी.

२) यापैकी "महाजल" कार्यक्रमांतर्गत मंजूर त्रिशंकू भागासाठी (साई सोसायटी, खिंडवाडी) पाणी पुरवठा योजना ही योजना कार्यान्वित झाल्यानंतर योजनेच्या लाभधारक ग्राहकांकडून महाराष्ट्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे रु. ५,०००/- प्रतिकुटुंब या प्रमाणे वर्गणी वसूल करावी.

३) शाहूवाडी पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील अटीनुसार योग्य ती कार्यवाही मजीप्राने करावी.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील माहिती तंत्रज्ञान कक्षातील अभियंते / कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत.**

या विषयानुषंगाने सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. म.जी.प्रा.मध्ये राज्यातील पाणी पुरवठा क्षेत्राशी निगडीत असलेले कामकाज संगणकावर करण्यासाठी उदा. जी.आय.एस. मॅपींग - या प्रणालीद्वारे पाणी पुरवठा क्षेत्रातील विविध भौगोलिक स्थळे, पाणी पुरवठयाची उपांगे व त्याचा डाटाबेस, शहरातील नागरी सोयी, एकमेकांशी असलेले संबंध, नागरी सोयीनुसार पाणी पुरवठा, शहरातील विविध मालमत्ता इत्यादी ज्ञान जी.आय.एस. वेबबेस संगणकीय प्रणालीद्वारे उपलब्ध करणे, पाणी पुरवठा योजना राबवितांना त्याचा वापर करुन घेणे विविध नागरी पाणी पुरवठा योजनांची संगणकीय जलशास्त्रीय संकल्पने तयार करणे इत्यादी विविध कामांसाठी म.जी.प्रा.मध्ये माहिती व तंत्रज्ञान कक्ष उघडण्यात आला आहे. या कक्षात अभियंते व चित्रशाखेतील कर्मचारी कार्यरत असून ते करीत असलेले काम हे वेगळ्या प्रकारचे असल्यामुळे व उच्चस्तरीय तांत्रिक ज्ञान अद्यावत ठेवून त्याचा म.जी.प्रा.तील पाणी पुरवठा योजनांमध्ये वापर करुन घेण्यासाठी असलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनाच्या १० टक्के (ग्रेड पे वगळून) इतका प्रोत्साहनात्मक भत्ता देणे आवश्यक

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

आहे. सदस्य सचिवांच्या या प्रस्तावावर चर्चा करुन शासन मान्यता प्राप्त करुन घेण्यास व पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यासाठी संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. ९ :- Change Management Unit (CMU) स्थापन करणे व त्यामध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचा-यांना प्रोत्साहनपर भत्ता देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासनाने, राज्याच्या सुवर्णजयंती महोत्सवाच्या निमित्ताने राज्यात महाराष्ट्र सुजल व निर्मल कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प सोडला आहे व त्यानुसार कामे हाती घेण्यात आली आहेत. या कार्यक्रमांतर्गत सन २०१२ पर्यंत पाणी व स्वच्छता क्षेत्रातील सुधारणा करण्याची कामे हाती घेण्यात येत आहेत.

सदर कामे मजीप्रामार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र, मजीप्राने आतापर्यंत केलेल्या कामाव्यतिरिक्त असल्याने अतिशय भिन्न स्वरुपाची आहेत. यामध्ये संगणकाचा उपयोग तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता लागणार आहे. साहजिकच याकरिता मजीप्राअंतर्गत महसूल विभागनिहाय Change Management Unit (CMU) स्थापन करण्याची अतिशय आवश्यकता भासत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. याबाबत मा.प्रधान सचिव यांनीही संचालक मंडळास अवगत केले.

यावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेमध्ये ठरल्यानुसार सदरचा कक्ष स्थापन करण्यात यावा. मात्र काम करणा-या कर्मचा-यांना प्रोत्साहनपर भत्ता देण्याच्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात आले की, सुरुवातीस १ वर्षासाठी १०% इतका भत्ता देण्यात यावा. मात्र तद्नंतर त्या १ वर्षात येणारा अनुभव, अपेक्षित मिळणारी कामे याबाबतचा आढावा घेऊन, सदरचे धोरण पुढे राबवावे किंवा कसे, याबाबतचा आढावा घेण्यात यावा व पुढील कार्यवाही करावी, असा निर्णय घेण्यात आला. या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

वरील सर्व बाबींचा विचार करता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रत्येक महसूल विभागात Change Management Unit (CMU) स्थापन करण्यास तसेच यामध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचारी ज्या वेतन बँड मध्ये वेतन घेत आहेत, त्या वेतन बँड श्रेणीच्या किमान वेतनाच्या १०% (ग्रेड वेतन वगळून) इतका प्रोत्साहनपर मोबदला देण्यास प्रायोगिक तत्वावर प्रथमत: फक्त १ वर्षासाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी व उपरोक्त विषयानुषंगाने C.M.U. स्थापन केल्याने म.जी.प्रा.ला आर्थिक फायदा होणार आहे किंवा कसे या संदर्भात प्रथम स्वयंस्पष्ट अहवाल मंजूर करण्याकरिता मा.अध्यक्ष, म.जी.प्रा. यांना सादर करावा असे निर्देशित करण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**आयत्यावेळची कार्यक्रम बाब क्र.१ : मा.मंत्री, ग्राम विकास तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सह-अध्यक्ष यांचे कार्यालयीन वापरासाठी नवीन वाहन खरेदी करण्याबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ नुसार मा.मंत्री ग्राम विकास हे म.जी.प्रा. च्या संचालक मंडळाचे पदसिध्द सह-अध्यक्ष असून त्यांच्या व अध्यक्ष, म.जी.प्रा. यांच्या कार्यालयीन वापरासाठी दोन नवीन होंडासिटी ॲटोमॅटीक वाहन खरेदी करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. नवीन होंडासिटी वाहन मा.मंत्री, ग्राम विकास तथा सह-अध्यक्ष यांना उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यांच्या वापरात असलेले वाहन क्र.एमएच-०४/एएन-७२७ हे त्यांनी म.जी.प्रा.च्या कार्यालयीन वापरासाठी परत करावे असे निर्देश दिले.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र २ :- स्थानिक संस्थांकडे देय असलेल्या म.जी.प्रा.च्या रकमेची वसूली करण्याकरीता वसूली पथके स्थापन करुन या कामासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना प्राप्त वसूल रकमेच्या काही प्रमाणात प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याबाबत.**

वरील कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत करुन प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याबाबत विनंती केली. याबाबत मा.अध्यक्ष यांनी असे निर्देश दिले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील मुख्य अभियंत्यांच्या स्तरावर एक समिती नेमून प्रोत्साहन भत्ता कोणास व कसा द्यावा याबाबत पूर्णत: आढावा घेऊनच सदर कार्यक्रम बाब पुढील बैठकीवेळी सादर करावी असे निर्देश दिले.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र ३ :- UIDSSMT च्या योजनांचे तांत्रिक मूल्यांकन करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निधीचे वाटप संबंधित कर्मचाऱ्यांना करण्याबाबत.**

UIDSSMT कार्यक्रमांतर्गत समाविष्ट योजनांचे तांत्रिक मूल्यांकन करण्याचे काम मजीप्राच्या पुणेस्थित मुख्य अभियंता कार्यालयात स्थापन केलेल्या तांत्रिक सल्लागार कक्षाकडे देण्यात आलेले आहे. सदर कक्षाने आजपर्यंत एकूण ११५ पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांचे मूल्यांकन अहवाल तयार करुन शासनास सादर केले आहे. व या अनुषंगाने या योजनांना मंजुरी प्राप्त होत असल्याचे सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, मजीप्रा पुणे यांनी संचालक मंडळास अवगत केले.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सदर मूल्यांकनासाठी मजीप्रास शुल्क देय असून आजपर्यंत केलेल्या कामाचे शुल्क रु.४४८ लक्ष इतके होत आहे. सदरचे काम हे नियमित कामाव्यतिरिक्त व जादा वेळेत केले असून व करावे लागत असल्याने हे काम करणा-या अधिकारी / कर्मचा-यांना प्राप्त होणा-या शुल्कामधून काही रक्कम वाटप करण्याचे प्रस्तावित असून त्यास मान्यता घेण्यासाठीची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे संचालक मंडळास अवगत केले.

चर्चेदरम्यान, सदर प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती जसे, आजपर्यंत किती योजनांना तांत्रिक मान्यता प्रदान केली, किती योजना मंजूर झाल्या, व एकूण किती शुल्क मजीप्रास प्राप्त झाले याची सविस्तर माहिती गोळा करुन सुधारित कार्यक्रम बाब आगामी बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. या अनुषंगाने कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र.४ :- मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रामधील नळधारकांना Spot Billing व्दारे पाण्याची देयके आकारणे व वितरीत करणे.**

राज्यातील २५ पाणी पुरवठा केंद्रांमध्ये दैनंदिन देखभाल व दुरुस्ती, पाणी पुरवठा व्यवस्था राखणे व महसूल वसूलीचे काम मजीप्राकडून करण्यात येते. यापैकी १९ पाणी पुरवठा केंद्राद्वारे ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा करण्यात येतो. सद्य:स्थितीत ग्राहकांना देण्यात येत असलेली देयके ही प्रचलित पध्दतीनुसार मजीप्रामार्फत वितरित करण्यात येऊन वसुली करण्यात येत आहे.

पाणी पुरवठा व्यवस्थेमध्ये गळतीची टक्केवारी (NRW) ही बाब अत्यंत महत्वाची असते व या पाणी गळतीची टक्केवारी भौतिक व वाणिज्यिक तूट या दोन प्रकारामध्ये येते. या पैकी पाणी देयक कार्यप्रणाली अधिक कार्यक्षमतेने राबविल्यास वाणिज्यिक तूट कमी करणे शक्य असते. वितरण व्यवस्थेमधील दृश्य गळत्या प्राधान्याने काढण्यात येतात. मात्र वाणिज्यिक तूटीचे प्रमाण सुध्दा जास्त असल्याने देयक आकारणी प्रणाली अधिक प्रभावीपणे राबविणे गरजेचे असल्याने २ विविध पर्यायांचा अभ्यास केला असून यापैकी ठेकेदाराची नेमणूक करुन अत्याधुनिक अशा Spot billing प्रणालीद्वारे ग्राहकांना देयके वितरित करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सद्य:स्थितीत प्रायोगिक तत्वावर अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रावर त्याची अंमलबजावणी सुरु असून या पा.पु.केंद्राचा फायदेशीर अनुभव लक्षात घेऊन इतर १८ पा.पु. केंद्रासाठी या प्रणालीची अंमलबजावणी करणे प्रस्तावित असल्याचे निदर्शनास आणून दिले.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती Spot billing द्वारे ग्राहकांना देयके वितरित करण्याबरोबरच ग्राहकाकडून वसुलीही त्याच ठेकेदाराकडून करण्यात यावी, असा निर्णय संचालक मंडळाने घेतला असून त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यप्रणाली निश्चित करण्यात यावी असे ठरले. या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

| | |
|---|---|
| मा.अध्यक्ष तथा मंत्री, | सदस्य सचिव |
| पा.पु. व स्व. | म.जी.प्रा. |

ठराव :

मजीप्राच्या १९ किरकोळ पाणी पुरवठा केंद्रांमधील नळधारकांना स्पॉट बिलिंग कार्यप्रणालीद्वारे देयके आकारुन वितरीत करण्यासाठी, पर्याय क्रमांक २- खाजगी कंत्राटदारांकडून पाणी देयकांची आकारणी व वितरण प्रणाली राबविणे, कार्यप्रणाली राबविण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, सद्य:स्थितीत अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रांतर्गत प्रायोगिक तत्वावर पर्याय क्र.२ नुसार कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाहीतून आर्थिक हितास्तव फायदेशीर अनुभव आल्यास इतर १८ किरकोळ पाणी पुरवठा केंद्रासाठी सदर Spot billing प्रणाली ग्राहकाकडून पाणीपट्टी वसुलीसह राबविण्यात यावी. मात्र सदर पाणी पुरवठा केंद्र निहाय ग्राहक संख्या, भौगोलिक परिस्थिती इ. बाबींचा अभ्यास करुन, सद्य:स्थितीत प्रतिदेयक येणाऱ्या खर्चापेक्षा कमी खर्चाचा प्रस्ताव येत असल्यास सदर प्रणाली विहीत पध्दतीचा अवलंब करुन अंमलात आणावी. याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**माहितीवजा कार्यक्रम बाब क्र.५:-** **पनवेल येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या मोकळ्या जागेवर खाजगी संस्थेच्या सहभागाने वॉटर हबची निर्मिती करणेबाबत..**

७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीची राज्यात अंमलबजावणी केल्यानंतर देखील राज्यातील सुमारे ६०% पेक्षा जास्त नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे, राबविणे व संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेस हस्तांतरीत करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची निवड केलेली आहे. त्यामुळे पिण्याचे शुध्द पाणी पुरवठयाशी संबंधीत राज्यातील एकमेव संस्था म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अभिमानाने पाहिले जाते. त्यामुळे राज्यातील तसेच देशातील पाणी पुरवठयासंबंधी कोणतीही माहिती व तंत्रज्ञान तसेच पाणी पुरवठासंबंधीचे मार्गदर्शन एकाच जागी मिळावे हयाकरिता म.जी.प्रा.च्या मालकीच्या पनवेल येथील जागेवर सिंगापूरच्या धर्तीवर **'वॉटर हब'** बांधणे प्रस्तावित असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

यासाठी पनवेल-तक्का येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या पनवेल येथील तक्का ठिकाणची मोकळी जागा या प्रकल्पाकरीता सुयोग्य अशी आहे. या मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ सुमारे ६७,३२५ चौरस फूट इतके असून या जागेवर सुमारे ५७,५२६ चौरस फूट इतके प्रचलित नियमानुसार बांधकाम करणे शक्य होणार आहे.

या प्रस्तावानुसार सिंगापूर मध्ये अस्तित्वात असलेल्या वॉटर हबमध्ये पाणी पुरवठा व्यवस्थेशी संबंधीत ज्या सोई सुविधा व उपकरणे उपलब्ध आहेत त्याच प्रकारच्या किंबहूना त्यापेक्षा जास्तीच्या सोई सुविधा तसेच उपकरणे एकाच छत्राखाली उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे, ज्यामध्ये प्रयोग शाळे अंतर्गत पाणी पुरवठा, पावसाचे पाणी वाहून नेण्याकरीता करावयांच्या व्यवस्था तसेच मलनि:सारण

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.